# नाशिक एज्युकेशन सोसायटी, नाशिक

द्वारा : पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक – ४२२००१ ● स्थापना : १ एप्रिल १९२३
सार्वजनिक न्यास नोंदणी क्र.. एफ–१०, नाशिक ● संस्था नोंदणी क्र. महाराष्ट्र–३१०, नाशिक.


जा.क्र. ७६/२०२६–२७ दिनांक ०१/०९/२०२६

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

सन्माननीय सभासद,

सप्रेम नमस्कार,

नाशिक एज्युकेशन सोसायटीची १०३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २७.०९.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर, टिळकपथ, नेहरू गार्डन जवळ, नाशिक – ४२२००१** येथे **संस्था अध्यक्ष, मा. प्रा. दिलीप फडके** यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय–**

०१. मागील दि. २१.०९.२०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून नोंद घेणे.
०२. संस्थेच्या सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी निवडून आलेल्या संस्था अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, एक कार्यवाह, आठ कार्यकारी मंडळ सदस्य व शिक्षक मंडळ सदस्य यांच्या निवडीची नोंद घेणे.
०३. संस्थेच्या सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी विश्वस्त मंडळासाठी दोन सदस्यांची निवड करणे.
०४. संस्थेच्या व संस्थेच्या शाळांचे सन २०२५–२६ चे अहवाल, जमाखर्च, वाढीव खर्च, ताळेबंद, तेरीजपत्रक यांस मंजुरी देणे.
०५. नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या सन २०२६–२७ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
०६. सन २०२६–२७ सालासाठी हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे.
०७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.

आपला,

**राजेंद्र निकम**
कार्यवाह
ना.ए.सोसायटी,नाशिक

**टीप–**

१. संस्थेचा वार्षिक अहवाल आणि श्री. एच.एम. गोविलकर, मे. गोविलकर ॲण्ड असोसिएटस यांनी संस्थेस सादर केलेल्या मूळ ऑडिट रिपोर्टची प्रत संस्थेची वेबसाईट www.nashikeducationsociety.org वर देखील उपलब्ध आहे.
२. संस्थेची जमाखर्चाची पत्रके व जमाखर्च संस्था कार्यालयात आणि शाळांची जमाखर्चाची पत्रके व जमाखर्च त्या त्या शाळेत मंगळवार दि. १५.०९.२०२६ ते गुरूवार दि. १९.०९.२०२६ पर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत संस्था कार्यालयात सुटीचे दिवस सोडून पहावयास मिळतील.
३. आपणास संस्थेचा वार्षिक अहवाल, जमाखर्च, ताळेबंद, तेरीजपत्रक, अंदाजपक, आर्थिक या संदर्भात किंवा अन्य प्रश्न विचारावयाचे असल्यास अथवा मांडावयाचे असल्यास ते लेखी स्वरूपात सोमवार दि. २१.०९.२०२६ पर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळात संस्था कार्यालयामध्ये सुटीचे दिवस सोडून आणून द्यावेत. आयत्या वेळी येणाऱ्या कोणत्याही आर्थिक वा अन्य प्रश्नांचा विचार करणे शक्य होणार नाही.
४. गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेतली जाईल. त्या तहकुब सभेस गणसंख्येची अट राहणार नाही.